## नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८४/२०११, निशाणी ५ वरील आदेश

१... वादीतर्फे सदर अंतरीम अर्ज व प्रतिज्ञापत्राद्वारे अशी विनंती करण्यात आली आहे की, दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी वाद मिळकतीसंदर्भात कोणताही त्रयस्थ हक्क करु नये. प्रतिवादींतर्फे सदर अर्जास विरोध करण्यात आला आहे.

२... वादीतर्फे असे कथन करण्यात आले की, तुकडी नाशिक पोटतुकडी सिन्नर मौजे पांगरी बुा येथील शेतजमीन मिळकत गट क्रमांक १५८/१ यांसी एकुण क्षेत्र २ हे १० आर यांसी चर्तुसिमा पुर्वेस — गट क्र. १५८/२, दक्षिणेस — गट क्र. १५९, पश्चिमेस — गट क्र. १६० व उत्तरेस — गट क्र. १५८/२. सदर मिळकतीमध्ये एक सामाईक विहीर आहे. सामाईक विहीरीत व पक्क्या स्वरुपाचे घर आहे. यापुढे **'वाद मिळकत'** म्हणून संबोधण्यात येईल. पुढे असे कथन करण्यात आले आहें की, तहसिलदार सिन्नर यांचेकडील वाटप पत्र क्रमांक एसआर/५५/१९८६ अन्वये आदेश दिनांक २७.१.१९८७ नुसार वाद मिळकतीच्या भोगवटदार सदरी वादीचा भाउ नामे नामदेव वाघाजी निकम याच्या नावाची नोंद झाली होती. सदर नामदेव वाघुजी निकम हा दिनांक ३०.०९.१९९२ रोजी मौजे पांगरी बुा येथे मयत झाला. त्यावेळेस मयत नामदेव निकम यांस हिंदु वारसा कायदा १९५६ नुसार वर्ग—१ मधील कोणीही वारस नव्हते. मयत नामदेव निकम यांस वादी हा भाउ व मनुबाई ही बहिण होती. त्यामुळे वादीने स्वता:चे व त्याची बहिण मनुबाई यांच्या नावाची नोंद वाद मिळकतीच्या महसुल दपतरी नोंदवली. सदर नोंद ही फेरफार क्रमांक ७६५९ नुसार आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी फेरफार क्रमांक ७६५९ विरोधात उपविभागीय अधिकारी निफाड यांचेकडे सदर नोंदीच्या तब्बल १२ वर्षांनी अपिल करुन त्यांच्या हक्कात आदेश करुन घेतला. त्या आदेशानुसार वादी व त्याच्या बहिणीच्या हक्कातील फेरफार क्र. ७६५९ नुसार नोंद कमी होवून प्रतिवादींच्या नांवे फेरफार क्रमांक ९७५१ नुसार दिनांक १४.८.२००७ रोजी नोंद वाद मिळकतीच्या महसुल दपतरी आली. त्यामुळे वादीस अश्चार्याचा धक्का बसला. तदनंतर वादीने उपविभागीय अधिकारी निफाड यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत

फेरफार क्र. ९७५१ मंजुर करणेकामी प्रतिवादींनी कोणते दस्त दाखल केले होते याची मागणी केली. त्या माहितीनुसार प्रतिवादीने त्यांचे शाळा सोडल्याचे दाखले व जन्मनोंदी दाखले असे प्रत्येकी दोन वेगवेगळे दाखले दिल्याचे समजले. प्रतिवादी क्र. १ याची शाळा सोडल्याची दाखल्यावरील जन्म दिनांम १.४.१९७८ ची असून गांव नमुना ९ येथील जन्म नोंदीचा दाखल्यामध्ये जन्म दिनांक ७.२.१९७७ ही आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ हिचा शाळा सोडल्याची दाखल्यानुसार जन्म दिनांक २९.९.१९८० असून गांव नमुना ९ येथील जन्म नोंदीचा दाखलानुसार जन्म नोंद दिनांक १३.४.१९७९ ची आहे. गांव नमुना ९ चे जन्म दाखलेचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ हिच्या दाखल्यात आईवडीलांचा कायमचा पत्ता या सदराखाली देव हा शब्द खोडून मुक्काम पोस्ट पांगरी, ता. सिन्नर, जि. नाशिक असे नमूद करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. २ हिच्या गांव नमुना ९ जन्म दाखल्यातील आईवडीलांचा कायमचा पत्ता पांगरी, ता. सिन्नर, जि. नाशिक असा देण्यात आलेला आहे. याबाबत वादीने त्याच्या वकीलांमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी जि. अहमदनगर यांचेकडे अर्ज केला असता त्या अर्जास उत्तर देतांना अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, अहमदनगर यांनी असा अभिप्राय दिला की, सदर दाखलयातील बदल किंवा खाडाखोड हा दाखला दिल्यानंतर संबंधीतांनी केली आहे व त्याबाबतची एक प्रत गटविकास अधिकारी अकोले, जि. अहमदनगर यांना दिली. अशा परिस्थितीत वादीला वाद मिळकतीवरील हक्कांसाठी हा दावा दाखल करावा लागला आहे. प्रतिवादी हे फेरफार क्रमांक ९७५१ या नोंदीचा गैरफायदा घेवून वाद मिळकत तबदील करण्याच्या प्रयत्नात आहे.

३... प्रतिवादीतर्फे जबाब निशाणी २८ प्रमाणे सादर करण्यात आला असून वाद मिळकतीचे वर्णन वगळता अर्ज व दाव्यातील इतर कथन अमान्य केलेले आहे. पुढे असे कथन केले आहे की, मयत नामदेव वाघुजी निकम हे प्रतिवादींचे वडील होते व त्यांचे मृत्युनंतर प्रतिवादींनी त्यांचे वारस म्हणून नांवे वाद मिळकतीच्या महसुल दपतरी नोंदवलेली आहे. तेव्हापासुन वाद मिळकतीचे मालक हे प्रतिवादी असून वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादींकडेच आहे. पुढे असे कथन करण्यात आले आहे की, प्रतिवादींनी त्यांची वारस नोंद करणेकामी उपविभागीय अधिकारी निफाड यांचेकडे अर्ज दाखल केला होता व त्या अर्जान्वये वादीस नोटीस काढून वादीच्या नावांची नोंद

रदद करण्यात आली आहे. सदर नोंदी विरुध्द वादीतर्फे अप्पर कमिशनर नाशिकरोड यांचे सदरी अपिल दाखल केले असून अपिलाचा निर्णय होईपर्यंत प्रतिवादींच्या हक्कातील नोंद क्र. ९७५१ हि बेकायदेशीर ठरत नाही. सबब वादीचा दावा फेटाळण्यात यावा.

४... वादीतर्फे सुविदय वकीलांनी असा युक्तीवाद केला की, दोन्ही प्रतिवादींनी जन्म दाखल्याच्या खोटया व बनावट प्रतीद्वारे प्रांतअधिकारी यांचेकडील प्रकरणात माहिती देवून त्याद्वारे खोटा आदेश स्वता:च्या हक्कात करुन घेतला आहे व त्याकारणाने प्रतिवादींची वाद मिळकतीवरील नोंद ९७५१ ही बेकायदेशीर आहे. पुढे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, सन १९९२ च्या पुर्वीपासून आजपर्यंत वाद मिळकतीवर वादीचा ताबा असून त्याबाबत विजेची बिले, स्थळ निरीक्षण अहवाल व शेजारील इसमांचे प्रतिज्ञापत्र हे वाद मिळकतीवर वादीचा ताबा आहे याबाबीस पुष्टी देतात. प्रतिवादी, त्यांची आई व त्यांचे पतीसोबत ५ ते ६ लोकांना घेवून ट्क्टरसह वाद मिळकतीमध्ये आले व वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला व याबाबत वादीने पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. पुढे असा युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी क्र. १ विरुध्द वादीने सिन्नर येथील न्यायालयात रेमुन १३५/२०१३ हा दावा सादर केला आहे व तो अदयाप प्रलंबीत आहे. वादीतर्फे पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, शाळा सोडल्याचा दाखला यावर प्रतिवादीचे वडीलांचे नांव वेगळे आहे तर निशाणी क्र. १५ नुसार मयत नामदेव निकम याचे रेशनकार्ड व शाळा सोडल्याचा दाखला दाखल केला असून त्याद्वारे केवळ नामदेव, त्याची बहिण व आई यांचाच उल्लेख आहे, प्रतिवादींचा उल्लेख कुठेही नाही. प्रतिवादीची आई मिराबाई याने रुपवते नावाच्या इसमाशी लग्न केले असून तिला इतर मुले आहे हे सुध्दा उपलब्ध अभिलेखावरुन सिध्द होत आहे. अशा परिस्थितीत वादी हे सिध्द करत आहे की, प्रतिवादी हे मयत नामदेव निकम याचे वारस नाहीत व त्या कारणाने वाद मिळकतीशी त्यांचा संबंध नाही. वादीतर्फे मा. उच्च न्यायालय, मुबंई यांनी **सरलादेवी कुदंनलाल विरुध्द शैलेश गौरीशंकर नामदेव नोंद लॉज (बॉम्बे) १९९५—११—६२.** त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, कायदयाचा अवलंब झाल्याशिवाय मिळकतीचा ताबा कोणासही हस्तांतर करता येणार नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, कर्नाटक यांनी **हिमअप्पा बसअप्पा**

**<u>डोडनकन्नवार वि. कृष्णाप्पा गंगाधरअप्पा नायकर नोंद लॉज (कर्नाटक) २०००—९—४८</u>** मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की जो व्यक्ती प्रथमदर्शनी वाद मिळकतीच्या ताब्यात आहे त्याच्या ताब्यास संरक्षण दिले पाहिजे. पुढे मा. उच्च न्यायालय मुबंई यांनी **<u>सोनाबाई रामचंद्र खोत व इतर वि. भिमराव कृष्णा खोत व इतर नोंद २०१२(४) महाराष्ट्र लॉ जर्नल ५४८</u>** मध्ये असे नमूद केले आहे की, महसुल नोंदीना गृहितकाचे मुल्य असून त्याद्वारे व्यक्तीस हक्क अथवा मालकी प्राप्त होवु शकत नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, मुबंई यांनी **<u>साजिद इस्माईल वि. सायराबी अब्दुल गफार शेख तर्फे वारस नोंद २०१४(१) महाराष्ट्र लॉ जर्नल १८२</u>** मध्ये सुध्दा हिच कायदयाची परिस्थिती नमूद केली आहे.

५... याउलट प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, गट क्र. १५८ ही वादी व प्रतिवादींची वडिलोपार्जित जमीन आहे. गट क्र. १५८ चे तहसिलदार सदरी वाटप झाले असून त्याद्वारे गट क्र. <u>१५८/१</u> हि मिळकत प्रतिवादींच्या वडीलांच्या नांवे देण्यात आली होती. प्रतिवादी हे मयत नामदेव वाघुजी निकम यांचे वारस असून वाद मिळकतीच्या महसुल दपतरी प्रतिवादींच्या नावाची नोंद बरोबर आहे. वाद मिळकतीच्या महसुल दपतरी आजरोजी प्रतिवादींच्या नावाची नोंद हि भोगवटदार व कब्जेदार म्हणुन दिसून येत आहे व वादीच्या नावाची नोंद दिसून येत नाही. वादी हे प्रतिवादीच्या वाद मिळकतीवरील हक्क हितसंबंधास हरकत अडथळा निर्माण करीत आहे. त्यामुळे कोणाताही हक्कसंबंध नसतांना प्रतिवादीनां त्रास देण्यासाठी हा खोटा दावा केला आहे. सदर अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादींना त्यांची मालकी हक्क हिरावली जाणार आहे व त्यामुळे प्रतिवादीस अपरिमीत नुकसान होवु शकते. प्रतिवादीस प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा तौल व तराजु प्रतिवादीच्या बाजुने आहे त्याकारणाने वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

६... एकंदरीत प्रकरणाचा विचार करता खालील मुददे विचारात घेवून त्यावर कारणासह माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| **<u>मुददे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|
| १.. वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा तौल व तराजु वादीच्या हक्कात आहे काय? | होय. |
| ३. | सदर अर्ज नामंजुर झाल्यास वादीस अपरिमित नुकसान होणार आहे काय? | होय. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशानुसार. |

## कारणमिमांसा

७... वादीतर्फे यादी निशाणी ३ नुसार दस्त दाखल करण्यात आले आहे. ७/१२ उता—याची प्रमाणीत प्रत निशाणी ३/१ हि २००९—१० या सालातील असून त्याद्वारे वाद मिळकतीच्या भोगवटदार सदरी प्रतिवादींच्या नावांची नोंद फेरफार क्र. ९७५१ नुसार झालेली दिसते. पुढे असे हि दिसून येते की, वाद मिळकत कसणारे म्हणून प्रतिवादींच्या नावांची नोंद आहे. ७/१२ उता—याची प्रमाणीत प्रत निशाणी ३/२ हि सन १९८४—८५ ते १९९३—९४ या कालावधीतील असून तिच्या भोगवटदार व जमीन कसणार या सदरी वादी व मंजुबाई माधव अंढागळे यांच्या नावांची नोंद ही नामदेव वाघुजी निकम यांचे नांव कमी होवून फेरफार क्र. ७६५९ नुसार झालेली दिसते. अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे पत्र निशाणी ३/३ नुसार असे दिसून येते की, ॲड. शिवराज नवले यांनी मागितलेली माहिती देण्याचा आदेश दिनांक २३.३.२०११ रोजी दिलेला आहे. पुढे असे दिसून येते की, जिल्हा निबंधक जन्ममृत्यु तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर यांना दिनांक २१.३.२०११ च्या पत्राद्वारे यांना आदेशीत केले आहे. पुढे गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले जि. अहमदनगर यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य जिल्हा परिषद अहमदनगर यांना दिनांक ३.१२.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, ग्रामपंचायत देवठाण येथील सन २००६ व २००७ चे जन्मनोंदीचे रजिस्टर पाहता प्रतिवादीच्या नावांची नोंद झालेली नाही व त्या नोंदीची खाडाखोड झालेली नाही. परंतु सन १९७७ च्या जन्मनोंद रजिस्टर अनुक्रमांक ५ वर स्त्री जातीच्या अपत्याची जन्म तारीख हि दिनांक ०७.०२.१९७७ बापाचे नांव नामदेव

वाघाजी निकम व आईचे नांव मिराबाई असे नमूद आहे. हि नोंद दिनांक ३१.७.१९९९ रोजी पंचायत समिती अकोले यांचे कार्यालयातुन जन्म झालेल्या मुलीचे नांव बिनीता नामदेव निकम या नावानिशी धरण्यात आलेली आहे. तसेच १९७९ च्या जन्म नोंद रजिस्टरला अनुक्रमांक १५ वर स्त्री जातीच्या अपत्य हे दिनांक १३.४.१९७९ रोजी झाली व तिचे बाप नामदेव वाघा निकम व आई मिराबाई अशी नोंद आहे व अडनांवात दुरुस्ती केलेली आहे. त्या नोंदीचा दाखला दिनांक ४.८.१९९९ रोजी पंचायत समिती अकोले यांचे कार्यालयातून देण्यात आला असून जन्म झालेल्या मुलीचे नांव सविता नामदेव असे आहे. तसेच सन १९८६ च्या जन्मनोंद रजिस्टरला अनुक्रमांक १४४ वर जन्म दिनांक २९.०९.१९८० रोजी सविता वडीलांचे नांव नामदेव वाघा निकम व आईचे नांव मिराबाई अशी नोंद मिराबाई यांच्या प्रतिज्ञापत्र दिनांक १०/०९/१९८६ वरुन व गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांचेकडील दिनांक ०९.०९.१९८६ च्या पत्रान्वये ग्रामपंयाल रजिस्टरला झालेली आहे. अशाप्रकारे सविता नामदेव निकम याच्या दोन वेगवेगळया जन्म नोंदी दिनांक १३.०४.१९७९ व २९.०९.१९८० या तारखा दोन वेगवेगळया रजिस्टरला दिसून येतात. त्यापैकी दिनाक २९.०९.१९८० ची नोंद हि मिराबाई नामदेव निकम यांनी १०.०९.१९८६ दिलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे करण्यात आल्यामुळे ती जबाबदार आहे. पुढे असे नमुद करण्यात आले आहे की, पंचायत समितीकडून देण्यात आलेल्या दोन्ही प्रतिवादींचे दाखल्यावर अनुक्रमांक ४ वरील मजकुर हा संबंधीतांनी नंतर टाकलेला आहे व त्यास कार्यालयातील शासकीय अधिकारी जबाबदार नाही. वादीतर्फे निशाणी ३/४ नुसार तहसिलदार यांनी उपविभागीय अधिकारी निफाड यांना पाठवलेली माहिती सादर केली आहे. पुढे नमुना क्र. ९ मधील जन्मनोंदीचा दाखला सविता नामदेव निकम हि दिनांक १४.४.१९७९ अन्वये व बनिता नामदेव निकम हि दिनांक ७.२.१९७७ रोजी जन्म झाला यानुसार आहे. त्यानंतर शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रनुसार बनिता हिची जन्मतारीख १.४.१९७९ आहे तर सविता हिची जन्मतारीख २९.९.१९८० आहे. वाटणीपत्राची छायांकीत प्रत निशाणी ३/५ ची पडताळणी केली असता असे दिसून येते की, दिनांक २०.१२.१९८५ रोजी वादी व मयत नामदेव निकम यांचे दरम्यान गट क्र. १५८ या मिळकतीचे वाटप झाले व त्यानुसार हिस्सा क्र. १ २ हे. १० आर हे नामदेव निकम तर हिस्सा क्र. २, २ हे १० आर हे वादीला देण्यात आले व त्यानुसार कब्जा

ही तुटक करण्यात आला. निशाणी ३/६ नुसार वादीच्या नावांवरील विज बील दिनांक ७.१२.१९९६ चे असून ते वादीच्या नावांने आहे. परंतु त्याचा वाद मिळकतीशी संबंध आहे हे दिसून येत नाही. विज बील निशाणी ३/७ हे जुन २०१० चे असून वादीच्या नांवे आहे परंतु त्याच्याशी वाद मिळकतीचा संबंध कसा आहे हे दिसून येत नाही. दस्त यादी निशाणी १५ नुसार वादीतर्फे नामदेव वाघाजी निकम याच्या कुटूंबाचे रेशनकार्ड दाखल करण्यात आले असून त्याद्वारे त्याचे कुटूंबात स्वता:ची, बहिणीची व सुनंदा हे सभासद आहे हे दिसून येते व हे रेशनकार्ड दिनांक ११.८.१९८२ चे आहे. दस्त यादी निशाणी ३१ नुसार तलाठी पांगरी, यांनी पंचनामा केला असून त्यात असे नमूद केले आहे की वाद मिळकती वादीच्याच कब्जे वहिवाटीत आहे. त्याचबरोबर कारभारी गबाजी कासार निशाणी ३३ व माधव बाबुराव कासार निशाणी ३४ यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यानुसार वाद मिळकती त्यांच्या शेजाशेजारी आहे त्यामुळे त्यांना त्याबाबत माहिती आहे. पुढे असे नमूद केले आहे की, नामदेव वाघाजी निकम याचा सन १९८२ मध्ये देवपूर येथील सोन्याबाई शिंदे या नावाच्या स्त्रीशी लग्न झाले होते व त्या लग्नसंबंधातून नामदेव यास कोणतेही अपत्य झाले नव्हते व नाही. लग्नाच्या ५ ते ७ वर्षानंतर सोन्याबाई ही नामदेवला कायमची सोडून गेली होती व पुन्हा नामदेवने दुसरे लग्न केले नव्हते. वाद मिळकत हि वादीच्या कब्जेवहिवाटीत असून दिनांक २३.१२.२०११ रोजी प्रतिवादी हे दांडगाईने वाद मिळकतीचा कब्जा ट्क्टर व इतर लोकांच्या मदतीने घेताना दिसून आले मुळत: प्रतिवादी यांच्या नावाचे अथवा इतर कोणतेही आपत्य नामदेव याला नव्हते असे असतांना प्रतिवादी हे वाद मिळकतीवर खोटा हक्क सांगत आहे. वादीने सदर प्रतिज्ञापत्राच्या पृष्ठयार्थ गट क्र. ६५/२ गांव मोजे वावी व गट क्र २११ याचे ७/१२ उतारे दाखल केले आहे. निशाणी ३६/१ नुसार दि. २३.१२.२०११ रोजीचा वावी पोलिस ठाणे येथील स्टेशन डायरी उतारा अभिलेखावर दाखल असून त्याद्वारे प्रतिवादींनी विजय खरात व राजेंद्र साळवे या लोकांसह वाद मिळकतीत येवून शेत नांगरण्याचा प्रयत्न केला व त्यास वादी व त्याच्या मुलाने विरोध केला असता त्यांना शिवीगाळ व मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली असे दिसते. निशाणी ३१/२ व वाद मिळकतीसंबंधी तलाठी पांगरी यांनी दिनांक १८.२.१९८४ रोजी केलेले स्थळ निरीक्षण असून त्याद्वारे वाद मिळकत अर्जदाराच्या ताब्यात आहे. निशाणी

३१/४ ला ग्रामविकास अधिकारी, देवठाण, अकोले, जि. अहमदनगर यांनी वादीच्या प्रतिज्ञापत्राची छायांकीत प्रत हि दिनांक १०.९.१९८६ ला दिली असून त्याद्वारे मिराबाई नामदेव निकम हिने नामदेव वाघाजी निकम यांचेपासून सविता नावाची मुलगी हि दिनांक २६.९.१९८४ रोजी झाली आहे असे नमूद केले आहे व त्याआधारे सविताची नोंद झालेली आहे. तलाठी देवठाण यांनी दिलेला दाखला निशाणी ३१/५ नुसार असे दिसून येते की, विष्णु शंकर रुपवते यांच्या कुटुंबामध्ये विष्णु शंकर रुपवते, मिराबाई विष्णु रुपवते, दिगंबर विष्णु रुपवते व भागवत विष्णु रुपवते असे सभासद आहे. शाळेत दाखल झाल्याचा उतारा निशाणी ३१/६ नुसार असे दिसून येते की, दिनांक ३१.८.१९८४ रोजी दिगंबर रुपवते याचा जन्म झालेला आहे. उलटपक्षी प्रतिवादीतर्फे कोणताही पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नसून वादीतर्फे दाखल त्यांच्या नावाचा वाद मिळकतीचा ७/१२ उतारा व वाटणीपत्रावर भिस्त ठेवली आहे.

८... गट क्रमांक १५८ चे वाटप होवुन गट क्रमांक १५८/१ म्हणजे वाद मिळकत हि नामदेव वाघाजी निकम व गट क्रमांक १५८/२ ही वादीस वाटप तुटक होवून मिळाली. नामदेव वाघाजी निकम हे अपत्यहिन मयत झाल्याने त्याचा भाउ व बहिण म्हणुन वादीने त्याचे व बहिणीचे नांव वाद मिळकतीचे महसुल दप्तरी फेरफार क्रमांक ७६५९ नुसार लावले. तदनंतर प्रतिवादींनी ही फेरफार नोंद क्रमांक ७६५९ अव्हाणीत करुन रदद केली व स्वता:चे नावाची फेरफार नोंद क्रमांक ९७५१ ही वाद मिळकतीचे महसुल दप्तरी आणली त्यामुळे सदर वाद उत्पन्न झाला आहे.

९... एकंदरीत वादकथन, पुरावा व युक्तीवादाचे अवलोकन करता असे दिसून येते की, वाद मिळकतीच्या महसुल दपतरी प्रतिवादींचे नांव भोगवटदार व कसणाराच्या सदरी असले तरी फेब्रुवारी २०१४ पर्यंत वाद मिळकतीवर वादीचाच प्रत्यक्ष ताबा आहे हे वादीतर्फे दाखल तलाठी यांचे स्थळ निरीक्षण अहवाल व आजुबाजुच्या लोकांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन दिसते. वादीच्या वाद मिळकतीवरील ताब्यास वादीने जोडजमावाने दबाव आणुन ट्क्टरच्या साहायाने हरकत अडथळा केल्याने वादीने पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली होती हे सुध्दा दिसते. त्यामुळे उपलब्ध परिस्थितीत हे स्पष्ट होते की, वाद मिळकत आजरोजी वादीच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत आहे व प्रतिवादी

हे दांडगाईने वादीच्या वाद मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे.

१०... प्रतिवादींनी वाद मिळकतीवरीत त्यांच्या नावाची नोंद हि फेरफार क्रमांक ९७५१ नुसार नोंदवलेली आहे. सदर नोंद हि प्रांत अधिकारी यांचे आदेशान्वये झालेली आहे. सदर नोंदी ही वादीच्या अपरोक्ष झालेली आहे याबाबत पुरावा नाही. सदर नोंद करतांना प्रतिवादींनी त्यांचे जन्माचे दाखले म्हणजेच पंचायत समिती अकोले यांच्या दप्तरातुन नमुना क्र.९ चे जन्म दाखले व शाळा सोडल्याचे दाखले हे प्रांत अधिकारी यांना दिले होते हे दिसते. त्यापैकी पंचायत समिती, अकोले यांनी नमुना क्र. ९ नुसार प्रतिवादी क्रमांक १ जन्म दिनांक ७.२.१९७७ व प्रतिवादी क्रमांक २ जन्म दिनांक १४.४.१९७९ हे दाखले प्रतिवादींना जन्म झालेल्या मुलामुलींच्या नावाविना देण्यात आले होते. परंतु, प्रतिवादींनी जन्म झालेल्या मुलामुलींच्या नावाच्या ठिकाणी स्वता: मजकुर लिहीलेला आहे अशी बाब गटविकास अधिकारी पंचायत समिती, अकोले, जि. अहमदनगर यांचा दिनांक ०३.१२.२०१० रोजीचा अहवाल, निशाणी ३/३ नुसार दिसून येते. सदर अहवालावरुन असे हि दिसून येते की, जर जन्म नोंदी दाखल्यांमध्ये मुलामुलींच्या नावाची नोंद नसेल तर पालकांकडून सहनिशा करुन माहिती निबंधकास दुरुस्ती करता येईल. परंतु, अशी दुरुस्ती केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे हे स्पष्ट होते की, पंचायत समिती अकोले यांचे जन्म नोंदीचे दाखले नमुना क्रमांक ९ या शासकीय कागदपत्रांमध्ये प्रतिवादींनी फेरफार केले व त्याआधारे फेरफार क्रमांक ९७५१ प्राप्त केला. या कारणाने फेरफार क्रमांक ९७५१ हा बेकायदेशीर ठरतो.

११... प्रतिवादींनी पंचायत समिती, अकोले यांनी दिलेले दोन्ही प्रतिवादींचे नमुना क्रमाक २ नुसार जन्म दाखले दिले असून त्याचबरोबर दोन्ही प्रतिवादींचे शाळा सोडल्याचे दाखले देखील सादर केले आहे. दोन्ही दस्तांमध्ये दोन्ही प्रतिवादींच्या जन्म तारखा हया वेगवेगळया दिसतात. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी जन्म तारखा दुरुस्त करुन घेणे आवश्यक होते. दोन्ही जन्म नोंदी पुर्णपणे वेगळया असल्याने व दुरुस्त करुन न घेतल्यामुळे त्या विचारात घेता येणार नाही. दोन्ही दाखले हे प्रतिवादींनी फेरफार क्रमांक ९७५१ ची नोंद मिळविणेकामी दाखल केले होते.

यावरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादींनी विसंगत व खोटया नोंदीच्या आधारे फेरफार क्रमांक ९७५१ प्राप्त केला आहे.

१२... नामदेव निकम यांच्या रेशनकार्ड दिनांक ११.८.९२ नुसार त्यास बहिण व सुनंदा याच्याशिवाय कोणीही कुटूंबात सदस्य नव्हते हे दिसते. तसेच कारभारी गबाजी कासार व माधव बाबुराव कासार यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी ३३ व ३४ नुसार नामदेव निकम यांना कोणीही अपत्य नव्हते. नामदेव निकम याची पत्नी सोनुबाई शिंदे हि लग्नानंतर ५ ते ७ वर्षांनी नामदेवला कायमची सोडून गेली होती. त्यानंतर नामदेवने दुसरे लग्न केले नव्हते. सोन्याबाई शिंदे हिच्याशी लग्नसंबंधातून नामदेवला कोणतेही अपत्य नव्हते. त्यामुळे हे स्पष्ट होते की, मयत नामदेव वाघाजी निकम हे अपत्यहिन मयत झाले आहे.

१३... मिराबाई नामदेव निकम हिचे दिनांक १०.९.८६ चे प्रतिज्ञापत्र विचारात घेतले तरी त्यासोबत विष्णु शंकर रुपवते रा. देवठाण, अकोले, जि. अहमदनगर यांचे कुटूंबाचा दाखला व त्यातील एक सभासद दिगंबर विष्णु रुपवते याचा शाळा सोडल्याचा दाखला सुध्दा अभिलेखावर उपलब्ध आहे. वादीच्या युक्तीवादानुसार मिराबाई हि विष्णु शंकर रुपवते याची पत्नी असून तिला दिगंबर नावाचा मुलगा हा दिनांक २०.८.१९८४ रोजी झाला होता व त्यामुळे मिराबाईने दिनांक १०.९.१९८६ रोजी दिलेले प्रतिज्ञापत्र हे संशयास्पद आहे. सदर परिस्थिती व युक्तीवाद लक्षात घेता प्रतिवादींतर्फे कोणताही पुरावा व प्रतिवाद सादर न केल्यामुळे असे दिसून येते की, मिराबाई हिला विष्णु रुपवते यांच्या लग्नसंबंधातून दिनांक २०.८. १९८४ रोजी दिगंबर हा मुलगा प्राप्त झाला मात्र त्यानंतरही तिने मिराबाई नामदेव निकम या नावाने दिनांक १०.९.१९८६ रोजीचे प्रतिज्ञापत्र तिचे शंकर रुपवते सोबतचे लग्नसंबंधाची माहिती लपवून लिहीली असल्याने संशयास्पद आहे. या व्यतिरिक्त मिराबाई व नामदेव निकम हे पति पत्नी होते व त्यासंबंधातून त्यांना प्रतिवादी हे अपत्य झाली याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. अशा सर्व परिस्थितीचा विचार करता हेच दिसून येते की, प्रतिवादी हे मयत नामदेव वाघाजी निकम यांचे वारस नाही. त्यामुळे फेरफार क्रमांक ९७५१ हा वादी व त्याची बहिण यांच्या हक्कावर गदा आणणारी आहे. सबब, वाद मिळकतीशी वादीचा व

तिच्या बहिणाचा हितसंबंध आहे हे स्पष्ट होत असल्याने वादीस प्रथमदर्शनी चांगली केस आहे या निष्कर्षास मी येत आहे. परिणामी मुददा क्रमांक १ यांस होकारार्थी उत्तर देतो.

**<u>मुददा क्रमांक २ व ३ चे विश्लेषण :</u>**

१४... वर नमुद केल्याप्रमाणे वादीस प्रथमदर्शनी केस आहे तसेच वाद मिळकतीमध्ये वादीची प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. वादीतर्फे सादर न्यायनिवाडे या बाबत बोलके असून वादीच्या केसला पुष्टी देत आहे. प्रतिवादीनी त्यांच्या पतींसह वाद मिळकतीत ट्क्टर घेवून नांगरण्याचा प्रयत्न केला तसेच वादी व त्याच्या मुलास शिवीगाळ, मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली व याबाबत वादीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे हे सुध्दा अभिलेखावरुन दिसून येते. याबाबत प्रतिवादींतर्फे कोणताही प्रतिवाद अथवा पुरावा सादर करण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत न्यायाचा तराजु वादीच्या हक्कात दिसतो. प्रतिवादींनी ज्या पध्दतीने फेरफार क्रमांक ९७५१ मिळवितांना माहिती दिली आहे ते पाहता प्रतिवादींचा हेतु शुध्द दिसून येत नाही. सदर अर्ज नामंजुर केल्यास वादीवर अन्याय होवून त्याचे अपरिमित नुकसान होवु शकते मात्र अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींना अपरिमित नुकसान होईल असे उपलब्ध परिस्थितीवरुन दिसून येत नाही. सबब मुददा क्रमांक २ व ३ यांना वादीच्या हक्कात होकारार्थी उत्तर देत आहे. एकंदरीत सर्व बाबींचा विचार करता खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१.. अर्ज निशाणी ५ मंजुर करण्यात येतो.

२.. प्रतिवादींना अंतरिम ताकीद देण्यात येते की, त्यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत अथवा कोणत्याही प्रकारे वाद मिळकतीसंबंधी त्रयस्थ हक्क हितसंबंध सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपावेतो करु नये.

३. खर्चाची मोजदाद दाव्यासोबत करण्यात यावी.

सही/—त्रत्रत्र

(मिलींद सा. जाधव)

दिनांक : ०६/०८/२०१४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सिन्नर.